# ऋणनिर्देश

शिक्षण हा राष्ट्रोध्दाराचा प्राण असतो. ग्रीक तत्वज्ञ सॉक्रेटिस म्हणतो, "जितक्या शाळा चांगल्या तितके राष्ट्र चांगले व जितके शिक्षक चांगले तितकी शाळ चांगली" शिक्षणाचे जे निरनिराळे स्तर आहेत. त्यामध्ये अंगणवाडी शिक्षण विभागाला अतिशय महत्वाचे स्थान आहे. अंगणवाडी शिक्षण हा शिक्षणाचा श्रीगणेशा आहे. या शिक्षणाचा व्यक्तिविकास, जीवनाची सफलता हे उद्दिष्टे मानले तर मुलांवर योग्य काळात योग्य संस्कार होणे आवश्यक आहे. देशाची कोणतीही योजना यशस्वी करावयाची असेल तर सुसंस्कारित नागरीक निर्माण करणे आवश्यक आहे. म्हणून बालवयात मुलांवर कसे संस्कार केले जातात, अशा शिक्षणात कोणकोणतया समस्या येतात, त्या समस्यांची माहिती मिळविण्यासाठी सदरहू संशोधन समस्या निवडली आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी "दक्षिण सोलापूर तालुक्यातील मराठी माध्यमाच्या अंगणवाडी शाळा मधील सर्व शिक्षिका, मुख्याध्यापिका, खाजगी शिक्षण संस्थाचे अध्यक्ष, ग्रामीण समुदाय विकास प्रकल्पाचे संचालक, समाज कल्याण खात्याचे अधिकारी, कामगार कल्याण अधिकारी गटशिक्षणाधिकारी, मी या सर्वांचा मनःपूर्वक आभारी आहे.

संशोधनासाठी संदर्भ ग्रंथ नियतकालिके व इतर संदर्भ साहित्य आवश्यक असते. संदर्भ ग्रंथ व संदर्भ साहित्य वेळोवेळी उपलब्ध करुन दिल्यामुळे मला ही सर्व माहिती मुद्देसुद व व्यवस्थित मांडता आली.

त्याबद्दल ज्या ग्रंथपालांनी व संस्थानी संदर्भ ग्रंथ उपलब्ध करुन दिले आहेत, त्यांचाही मी आभारी आहे.

डॉ. पठाण नसीम महंमदखान यांचा व प्राध्यापक कस्तुरबाई शिक्षणशास्त्र महाविद्यालय सोलापूर यांनी वेळोवेळी जे सहकार्य व मार्गदर्शन केले त्यामुळेच मला हा प्रबंध एम.फिल. पदवीसाठी शिवाजी विद्यापीठास सादर करण्याची संधी मिळाली त्याबद्दल मी त्यांचा कृतज्ञ आहे.

संशोधन काळातील सर्व प्रकारचे टंकलेखन व मुद्रण अतिशय तत्परतेने व अचूक करुन दिल्याबद्दल श्री. संतोष सुभाष फाटक यांचाही मी आभारी आहे. या प्रबंधास ज्यानी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे सहकार्य केले आहे. त्यांचेही मी आभार मानतो.

स्थळ :- कोल्हापूर

दिनांक :- १८/६/२००४

श्री. सि.भि.कोणदे